पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपद्वारे देशातील १३९६ शासकीय औ.प्र.संस्थांचा दर्जा वाढ करणे या योजनेअंतर्गत २००८-०९ मध्ये राज्यातील ५५ औ. प्र. संस्थांचा दर्जावाढ करणे व सेंटर ऑफ एक्सलन्सची स्थापना करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांकः पीपीपी-२००९/(३६/०९)/व्यशि -५,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दि. २० जुलै, २००९.

संदर्भ :- १) शासन निर्णय आय.टी.आय २००७/(१६२/०७) व्यशि- २ दि.३१/१२/२००७
२) शासन निर्णय क्रमांकः आयटीआय२००८/(३४६/०८)/व्यशि -२, दि.९.९ २००८
३) संचालक(प्रशिक्षण)पत्र क्रमांक-१९/पीपीपी-१३९६/२००९/६७, दि.१.४.२००९

**प्रस्तावनाः** औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधुन दिले जाणारे प्रशिक्षण कारखान्यातील तंत्रज्ञानाच्या गरजेशी सुसंगत होण्यासाठी व कौशल्ययुक्त जागतिक दर्जाचे मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी कारखाने/औद्योगिक संघटना यांच्या सहकार्याने केंद्र शासनाने सन २००५ पासून देशातील औ.प्र.संस्थांचा दर्जा उंचावून त्यांना सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये रूपांतरीत क रण्याची योजना सुरू केलेली आहे. या अंतर्गत संपूर्ण देशातील ५०० औद्योगिक प्रशिक्षण संस्थाचा दर्जावाढ करण्यात येत आहे. उर्वरीत १३९६ औ.प्र.संस्थाचा दर्जावाढ खाजगी उद्योगाच्या सहभागाने (Public Private Partnership) माध्यमातून करण्याची घोषणा केंद्रिय वित्तमंत्री यांनी सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पीय भाषणात केलेली आहे.

केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार खाजगी उद्योगाच्या सहभागाने ( Public Private Partnership) राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थाचा दर्जावाढ करण्यास संदर्भाधिन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्याप्रमाणे संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये सन २००७-०८ मध्ये राज्यातील ६२ संस्थांमध्ये सेंटर ऑफ एक्सलन्सची स्थापना व दर्जावाढ करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सन २००८-०९ मध्ये ५५ औ.प्र.संस्थांचा दर्जावाढ करण्यास केंद्रशासनाने मान्यता दिलेली असून संबंधित ५५ औ.प्र.संस्थातील संस्था व्यवस्थापन समितीच्या बचत बँक खात्यात प्रत्येकी रू.२.५ कोटी प्रमाणे एकूण रू. १३७.५ कोटी रक्कम व्याजमुक्त कर्जरूपाने जमा करण्यात आलेली आहे.

२. उपरोक्त योजनेतंर्गत सदर ५५ औ.प्र.संस्थांचा दर्जावाढ करण्यासाठी संबंधीत औ.प्र.संस्थांच्या संस्था व्यवस्थापन समितीने संस्था विकास आराखडे तयार केलेले असून ते राज्य सुकाणू समितीने व केद्रशासनाने मान्य केलेले आहेत. या ५५ औ.प्र.संस्थापैकी २८ संस्थात इतर परंपरागत व्यवसाय अभ्यासक्रमासह सेंटर ऑफ एक्सलन्स योजनेच्या निकषाप्रमाणे व्यवसाय अभ्यासक्रमाच्या गट /सेक्टरप्रमाणे निवड करून दर्जावाढ करणे तसेच उर्वरीत २७ औ. प्र. संस्थांमध्ये सध्या सुरू असलेल्या मुळ व्यवसाय अभ्यासक्रमाचा विकास करून दर्जावाढ करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णयः** उपरोक्त पार्श्वभूमिवर सन २००८-०९ मध्ये खाजगी उद्योगाच्या सहभागाने ( Public Private Partnership) राज्यातील ५५ औद्योगिक प्रशिक्षण संस्थाचा दर्जावाढ प्रतिसंस्था रु.२.५०

कोटी याप्रमाणे केंद्रशासनाकडून उपलब्ध झालेल्या बिनव्याजी कर्जाऊ रकमेमधून करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदरहू ५५ औ. प्र. संस्थांपैकी २८ औ. प्र. संस्थांमध्ये (प्रपत्र-अ) इतर परंपरागत व्यवसाय अभ्यासक्रमासह सेंटर ऑफ एक्सलन्स योजनेच्या निकषाप्रमाणे व्यवसाय अभ्यासक्रमाच्या गट/सेक्टरप्रमाणे निवड करून दर्जावाढ करण्यास व उर्वरित २७ औ. प्र. संस्थांमध्ये (प्रपत्र-ब) सध्या सुरू असलेल्या मूळ व्यवसाय अभ्यासक्रमाचा विकास करून दर्जावाढ करण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सु. न. जोशी)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/ अमरावती/नागपूर.

मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय (संचालक(प्रशिक्षण) यांचे मार्फत)

प्राचार्य, संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्था (संचालक(प्रशिक्षण) यांचे मार्फत)

संबंधित औ. प्र. संस्थातील संस्था व्यवस्थापन समिती सचिव (संचालक(प्रशिक्षण) यांचे मार्फत)

महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र मुंबई-१ / नागपूर-२.

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई-१ / नागपूर-२.

अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई.

संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी कार्यालय.

वित्त विभाग/नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

निवड नस्ती/ व्यशि-२.

शासन निर्णय क्रमांक :पीपीपी २००९/(३६/०९) व्यशि- ५, दिनांक २० जुलै,२००९ चे सहपत्र

# प्रपत्र - अ

## पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपद्वारे व्यवसाय अभ्यासक्रम ( सेक्टर) निहाय सेंटर ऑफएक्सलन्सची स्थापना करण्यात येणा-या औ.प्र.संस्थाची यादी (२००८-०९)

| अ. क्र. | औ. प्र. संस्थेचे नांव व जिल्हा | व्यवसाय गट (सेक्टरचे नाव) | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १ | अंधेरी जि. मुंबई उपनगर | एव्हिएशन | ९६ |
| २ | मुरबाड जि. ठाणे | प्रॉडक्शन ॲण्ड मॅन्युफॅक्चरींग | ९६ |
| ३ | कर्जत जि. रायगड | हॉस्पिटॅलिटी | ९६ |
| ४ | मालवण जि. सिंधुदुर्ग | कस्ट्रक्शन ॲण्ड वुड वर्कीग | ९६ |
| ५ | वेल्हे जि. पुणे | प्रॉडक्शन ॲण्ड मॅन्युफॅक्चरींग | ९६ |
| ६ | सोलापूर (मु) जि. सोलापूर | ॲप्ररल | ९६ |
| ७ | सांगोला जि. सोलापूर | फॅब्रिकेशन( फिटीग ॲण्ड वेल्डीग) | ९६ |
| ८ | शिरोळ जि. कोल्हापूर | प्रॉडक्शन ॲण्ड मॅन्युफॅक्चरींग | ९६ |
| ९ | पारनेर जि. अहमदनगर | फॅब्रिकेशन( फिटीग ॲण्ड वेल्डीग) | ९६ |
| १० | संगमनेर जि. अहमदनगर | प्रॉडक्शन ॲण्ड मॅन्युफॅक्चरींग | ९६ |
| ११ | गंगापूर जि. औरंगाबाद | प्रॉडक्शन ॲण्ड मॅन्युफॅक्चरींग | ९६ |
| १२ | अंबेजोगाई जि. औरंगाबाद | फॅब्रिकेशन( फिटीग ॲण्ड वेल्डीग) | ९६ |
| १३ | हिंगोली जि. हिंगोली | ऑटोमोबाईल | ९६ |
| १४ | उमरगा जि. उस्मानाबाद | ऑटोमोबाईल | ९६ |
| १५ | भातकूली जि. अमरावती | फॅब्रिकेशन( फिटीग ॲण्ड वेल्डीग) | ९६ |
| १६ | अचलपूर जि. अमरावती | फॅब्रिकेशन( फिटीग ॲण्ड वेल्डीग) | ९६ |
| १७ | चिखली जि. बुलढाणा | ऑटोमोबाईल | ९६ |
| १८ | दिग्रस जि. यवतमाळ | ऑटोमोबाईल | ९६ |
| १९ | घाटंजी जि. यवतमाळ | इनफॉरमेशन टेक्नालॉजी | ९६ |
| २० | हिंगणा जि. नागपुर | इलेकट्रीकल | ९६ |
| २१ | भिवापूर जि. नागपुर | इलेकट्रीकल | ९६ |
| २२ | पारशिवनी जि. नागपुर | इलेकट्रीकल | ९६ |
| २३ | नरखेड जि. नागपुर | इलेकट्रीकल | ९६ |
| २४ | समुद्रपूर जि. वर्धा | इलेकट्रीकल | ९६ |
| २५ | पवनी जि. भंडारा | ऑटोमोबाईल | ९६ |
| २६ | लखंदुर जि. भंडारा | ऑटोमोबाईल | ९६ |
| २७ | मोहाडी जि. भंडारा | इलेकट्रीकल | ९६ |
| २८ | अर्जुनीमोरेगाव जि. गोंदिया | इलेकट्रीकल | ९६ |

शासन निर्णय क्रमांक : पीपीपी २००९/(३६/०९) व्यशि-५, दिनांक.२० जुलै,२००९ चे सहपत्र

## प्रपत्र - ब

### पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपद्वारे दर्जावाढ करण्यात येणा-या औ. प्र. संस्थांची यादी (२००८-०९)

| अ.क्र. | औ.प्र.संस्थ्रेचेनांव | जिल्हयाचे नांव | अ.क्र. | औ.प्र.संस्थ्रेचेनांव | जिल्हयाचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १ | पेण | रायगड | १५ | पेठ | नाशिक |
| २ | उरण | रायगड | १६ | मालेगाव | नाशिक |
| ३ | श्रीवर्धन | रायगड | १७ | शहादा | नंदुरबार |
| ४ | अलिबाग | रायगड | १८ | अमळनेर | जळगाव |
| ५ | मुरुड | रायगड | १९ | चाळीसगाव | जळगाव |
| ६ | मंडणगड | रत्नागिरी | २० | यावल | जळगाव |
| ७ | रत्नागिरी (मु) | रत्नागिरी | २१ | राहूरी | अहमदनगर |
| ८ | राजापूर | रत्नागिरी | २२ | चाकूर | लातूर |
| ९ | शिराळा | सांगली | २३ | रेणापूर | लातूर |
| १० | आटपाडी | सांगली | २४ | मुर्तीजापूर | अमरावती |
| ११ | सोलापूर (दक्षिण) | सोलापूर | २५ | मलकापूर | बुलढाणा |
| १२ | कुर्डूवाडी | सोलापूर | २६ | शेगाव | बुलढाणा |
| १३ | पाटण | सातारा | २७ | राळेगाव | बुलढाणा |
| १४ | कोरेगाव | सातारा | | | |